# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/11/2023 (शुक्रवार) दुपार

## घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १९ किमी अंतरावर मौजा निसतखेडा येथे दिनांक १६/११/२०२३ चे अंदाजे ०५/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय पुरूषेत्तम चव्हाण, वय ३० वर्ष, रा. निसतखेडा ता. रामटेक हे अक्षिद लावण्या करीता पत्नीसह गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घरातील लोखंडी आलमारीचे लॉक तोडुन व दुसरी लोखंडी आलमारी कापसाचे शेतात नेवुन तिचे लॉक तोडुन आलमारीतील दि. १६/११/२०२३ चे रात्री १२/०० वा. ते दि. १७/११/२०२३ चे पहाटे ०३/३० वा. दरम्याण फिर्यादीचे घरी ठेवलेली लोखंडी टिनाची आलमारी ही कापसाचे शेतात नेवुन व तिचे लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने कोणीतरी अज्ञात चोरांनी कापसाचा शेतात लॉक तोडुन त्यामध्ये असलेले कागदपत्रे व कपडे अस्ताव्यस्त फेकुन तसेच आलमारीचा लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने १) मंगळसूत्र १.५ तोळा जुने विस वर्षा पुर्वीचे अंदाजे किंमती ४००००/– रुपये, २) चपलागंटी ३ तोळा जुने चाळिस वर्षापुर्वीचे अंदाजे किंमती ३०,०००/–रुपये ३) अंगुठी दोन प्रत्येकी ४ ग्रॅम एकुण ८ ग्रॅम जुने २५ वर्षा पुर्वीचे अंदाजे किंमती २४,०००/–रुपये ४) अंगुठी तिन प्रत्येकी ४ ग्रॅम एकुण १२ ग्रॅम नविन वापरचे अंदाजे किंमती ३६,०००/–रुपये ५) गोफ दहा ग्रॅम जुना ३५ वर्षा पूर्वीचे अंदाजे किंमती २४,०००/–रुपये ६) गोफ एक तोळा नविन अंदाजे किंमती २०,०००/– रुपये तसेच नगदी ५०००/– रुपये असा एकूण २,०९०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार पोस्टे रामटेक मो. क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

## बॅटऱ्या चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०.५ किमी अंतरावर वर्धा फाटा कोंढाळी येथे दिनांक ०८/११/२०२३ चे ०१.०० वा. ते ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामलाल गणेशराव लाडके, वय ३८ वर्ष, रा. गांधी ले आउट कोंढाळी हा इन्फ्रा प्रायव्हेट लिमीटेड कंपनिचे वर्धा फाटा कोंढाळी रोडचे मागील दीड ते दोन वर्षापासून काम चालू असून त्या ठिकाणी ४ ते ५ आयसर व टिप्परचे चौकीदारीचे मागील एक वर्षापासून काम करत आहे. दि. ०७/११/२०२३ रोजी सायंकाळी नेहमी प्रमाणे चौकीदारी करीता आला व चौकीदारी करत असताना वर्धा रोड कोंढाळीने राऊंड मारत होता. दि. ०८/११/२०२३ चे रात्री ०४/०० वा. दरम्यान फिर्यादी राऊंड मारत असतांनी त्याला १० चक्का टिप्पर क्र. एम.एच ३२/ए.जे.–१६३५ चे बॅटरी बॉक्स उघडे दिसले तेव्हा त्याने टिप्पर क्र. एम. एच– ३२/ए.जे.–१६३५ गाडीचे बॅटरी बॉक्स बघीतले असता एक्साईड गोल्ड १३० कंपनिच्या दोन जून्या बॅटऱ्या अंदाजे किंमती १०,०००/– रू च्या कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्या आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार भोजराज तांदुळकर, मो. नं. ९९२३३१४४४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**